नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०८/२०२६ (बुधवार )

........................................................................................................

## मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे NADT येथे "Generative AI : Opportunities and Risks in Public Administration" या विषयावर मार्गदर्शन

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी ( **National Academy of Direct Taxes - NADT**), नागपूर येथे भारतीय महसूल सेवा (**IRS**) च्या ७९ व्या बॅचच्या इंडक्शन कोर्स अंतर्गत प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसाठी आयोजित विशेष प्रशिक्षण सत्रामध्ये दिनांक ०४/०८/२०२६ आणि ०५/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी **"Generative AI : Opportunities and Risks in Public Administration"** या समकालीन व महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले.

या सत्रामध्ये मा. श्री. हर्ष ए पोद्दार, यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (**Artificial Intelligence**) आणि जनरेटिव्ह एआय (**Generative AI**) या आधुनिक तंत्रज्ञानाचा सार्वजनिक प्रशासन, कायदा व सुव्यवस्था, तपास, नागरिकाभिमुख सेवा, दस्तऐवज निर्मिती, माहिती विश्लेषण, निर्णय प्रक्रिया आणि शासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी होणारा उपयोग याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी जनरेटिव्ह एआयच्या वापरातून मिळणाऱ्या विविध संधींबरोबरच डेटा गोपनीयता, सायबर सुरक्षा, चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती तसेच एआयचा जबाबदारीने व सुरक्षितपणे वापर करण्याबाबतही प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. हे मार्गदर्शन सत्र अत्यंत माहितीपूर्ण, अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी ठरले असून उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी (**NADT**) येथे आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे भावी भारतीय महसूल सेवा अधिकाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा जबाबदारीने व परिणामकारकपणे उपयोग करण्याबाबत महत्त्वपूर्ण दिशा मिळाली.





## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ०८ म्हशी जनावरांची सुटका, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०४/०८/२०२६ रोजी सावनेर पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खापा फाटा पाटणसांवगी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान १) महिंद्रा बोलेरो पिकअप क्र. एम एच—४०/सी डी ४३५९ २) वाहन क्र. एम एच—४०/सी टी— ८७०८ मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **आरोपी नामे १) सुभाष श्रीराम इनवाते, वय २२ वर्ष २) विक्रम सुनिल भलावी, वय १९ वर्ष, दोन्ही रा. जमुनिया कला, ता. बिछूआ जि. छिंदवाडा म. प्र. ३) नंदकिशोर चैनसिंग गोणेकर, वय ३२ वर्ष, रा. रांजना, ता. छिंदवाडा म. प्र.** हे मिळुन आले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता दोन्ही वाहनात प्रत्येकी

०४ म्हशी याप्रमाणे त्यामध्ये ०८ म्हशी जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून दोन्ही वाहने आणि ८ म्हशी जनावरे असा एकुण किंमती ११,५५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आरोपी **१) सुभाष श्रीराम इनवाते, वय २२ वर्ष २) विक्रम सुनिल भलावी, वय १९ वर्ष, दोन्ही रा. जमुनिया कला, ता. बिछूआ जि. छिंदवाडा म. प्र. ३) नंदकिशोर चैनसिंग गोणेकर, वय ३२ वर्ष, रा. रांजना, ता. छिंदवाडा म. प्र.** यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे कलम ११(१), (डी), (ई), (एफ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०२ गुन्हे नोंद.

दिनांक ०४/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २३७५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे ज्ञानेश्वर अशोक सदावर्ती, वय ३५ वर्ष, रा. ईतवारीपेठ उमरेड हा अवैधरीत्या सट्टापट्टी जुगार खेळताना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १) संतोष मनबोधी औजा, वय ४७ वर्ष २) अनिल माधवरावजी बावणे, वय ४० वर्ष, ३) गुरूदयाल रामलाल बिसेन, वय २६ वर्ष, रा. बाजारगाव ४) आदीत्य निकोसे, रा. बाजारगाव हे अवैधरीत्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद

दिनांक ०४/०८/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७०३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे सोनू रामकृष्ण सोनवणे, वय ३३ वर्ष, रा. पलीया शाळेजवळ पहलेपार, सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा येथे** आरोपी नामे हर्ष सुनिल दहीकर, वय २६ वर्ष, रा. वार्ड नंबर ०१, नागलवाडी ता. सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे १) ज्ञानेश्वर बालाजी कोल्हे, वय ६५ वर्ष, रा. नांदागोमुख, ता. सावनेर २) अमित चौतराम राउत, वय २८ वर्ष, रा. भौतिया वडचिचोली, ता. जि. पांढुर्णा, ह. मु. शिवराज फॅमिली ढाबा खुरसापार, ता. सावनेर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार येथे** आरोपी नामे मनोज मदन कोडवते, वय ४५ वर्ष, रा. खापा, ता. रामटेक याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक येथे** आरोपी नामे १) प्रेम जोगेन्द्र रौतेल, वय २२ वर्ष, रा. कांद्री माईन, ता. रामटेक २) अतुल शामरावजी झुरे, वय ३२ वर्ष, रा. सालई माहुली, ता. पारशिवनी ह. मु. कांद्री माईन यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** आरोपी १) देवेंद्र योगराज नागमोते, वय २७ वर्ष, रा. दिंदरगाव, ता. नरखेड २) रमाकांत सदाशिव भोसले, वय ३२ वर्ष, रा. सातनुर, ता. वरुड, जि. अमरावती यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे** आरोपी १) अर्जुन मधुकर उईके, वय ३० वर्ष, रा. खापरी केने, ता. नरखेड २) अक्षय गजानन राउत, वय ३१ वर्ष, रा. वाढोणा, ता. काटोल ३) गंगाधर बकाराम येडमे, वय ५४ वर्ष, रा. वंडली वाघ, ता. काटोल ४) रोहन प्रभाकर मडके, वय २० वर्ष, रा. ढवळापुर, ता. काटोल ५) संदीप श्रीधरराव राउत, वय ४१ वर्ष, रा. लाडगाव, ता. काटोल ६) नरेश रायभान सर्याम, वय ३५ वर्ष, रा. गोंडी खापा, ता. काटोल, ह. मु.लक्ष्मी नगर काटोल, ता. काटोल ७) प्रमोद पुरूषोत्तम गायधने,

वय ४१ वर्ष, रा. हनुमान नगर काटोल, ता. काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०७ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ३३३० मिली देशी दारू, ५४ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ७०३०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने